# ऑनलाईन बदल अर्ज (Change Reports) - कार्यप्रणाली

१. विश्वस्तांनी बदल अर्ज (Change Reports) संकेतस्थळावरील विहीत नमुन्यात सादर करावेत.

२. विश्वस्तांनी बदल अर्जासोबत खालीलप्रमाणे दस्तऐवजांच्या स्कॅन प्रती संकेतस्थळावर जोडाव्यात.

   i) बदल करण्यासंबंधी विश्वस्तांच्या सभेची नोटीस

   ii) सभेमधील सर्व विश्वस्तांनी मान्यता दिलेल्या संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत

   iii) एकच विश्वस्त असल्यास विश्वस्त वाढविणे किंवा कमी करणे याबाबतचे त्या विश्वस्तांचे स्वाक्षरी असलेले पत्र.

   iv) नवीन येणाऱ्या विश्वस्तांचे संमतीपत्र व पुर्ण माहिती (पुर्ण पत्ता, ओळखपत्र, मोबाईल नंबर, फोन नंबर, ईमेल आयडी.)

   v) आऊटगोईंग विश्वस्तांचे नियम ६(४) प्रमाणे शपथपत्र. परंतु ज्यावेळी असे आऊटगोईंग विश्वस्त अथक प्रयत्नानंतरही कार्यालयात हजर होत नाहीत त्यावेळी संबंधित ध.उ.आ. किंवा स.ध.आ शपथपत्राची अट शिथिल करु शकतात.

   vi) ट्रस्ट डीड / घटना/ योजना

   vii) इतर आवश्यक कागदपत्र

३. सादर झालेले बदल अर्ज अधिक्षक यांनी तपासून घ्यावेत. त्यासोबत असलेले उपरोक्त दस्तऐवज स्कॅन करुन पाठविले आहेत की नाही याची शहानिशा करावी.

४. दस्तऐवजांची पुर्तता झालेली नसल्यास विश्वस्तांना तशी पुर्तता करण्यास ई-मेलद्वारेच कळवावे.

५. दस्तऐवजांची पुर्तता झालेली असल्यास अधिक्षकांनी सादर झालेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्तांपुढे ठेवावी.

६. सहायक धर्मादाय आयुक्तांनी ही माहिती तपासून घेऊन विश्वस्तांस त्यांनी कार्यालयात हजर होण्याची तारीख कळवावी. तसेच येताना विश्वस्तांनी सादर केलेला बदल अर्ज आणि दस्तऐवज यांच्या छायांकित प्रती व मुळ प्रती सोबत आणाव्यात असे कळवावे.

७. विश्वस्त त्या तारखेस हजर झाल्यास अधिक्षकांनी बदल अर्ज व त्या सोबतचे दस्तऐवज त्याच्या छायांकित प्रती, मुळ प्रतींवरुन तपासून घ्यावेत आणि तसा शेरा

छायांकित प्रतीवर नमुद करावा. तसेच त्या प्रती ऑनलाईन जमा झालेल्या प्रतींबरोबर तपासून घ्याव्यात.

८. अधिक्षकांनी बदल अर्जाच्या तपासलेल्या छायांकित प्रती सहायक धर्मादाय आयुक्तांपुढे ठेवाव्यात आणि सहायक धर्मादाय आयुक्तांनी त्या पुन्हा मुळ प्रती आणि ऑनलाईन पाठविलेल्या प्रती यांच्याशी तुलना करुन तपासून घ्याव्यात.

९. बदल अर्ज कायदेशीर आहे की नाही या निर्णयाप्रत येणेसाठी आवश्यक ती सर्व पुर्तता झालेली असल्यास त्याच दिवशी सहायक धर्मादाय आयुक्तांनी आवश्यक ती चौकशी करुन बदल अर्ज मंजुर करावा किंवा ते शक्य नसल्यास १५ दिवसांच्या आतील पुढील तारीख द्यावी आणि या दिलेल्या तारखेस बदल अर्जावर पुढील आदेश करावेत.

१०. सहायक धर्मादाय आयुक्तांना कोणाही संबंधितास नोटीस काढण्याची आवश्यकता आहे असे वाटल्यास त्यांनी विश्वस्त येतील त्या दिवशी पहिल्याच तारखेस किंवा जास्तीत जास्त दिलेल्या दुसऱ्या तारखेस नोटीसा काढाव्यात.

११. बदल अर्जास हरकती न आल्यास नोटीस काढल्याच्या तारखेपासुन १ महिन्याच्या आत बदल अर्जावर पुढील आदेश होईल असा सहायक धर्मादाय आयुक्तांनी प्रयत्न करावा.